राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे

Government of Maharashtra

# राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

## निपुण महाराष्ट्र अभियानांतर्गत कृती कार्यक्रम

## निपुण महाराष्ट्र कृती कार्यक्रमाचे ध्येय–

इ. २ री ते ५ वी च्या प्रत्येक वर्गातील किमान ७५ टक्के विद्यार्थ्यांनी या कृती कार्यक्रमांतर्गत अपेक्षित सर्व अध्ययन क्षमता प्राप्त करणे.

## कृती कार्यक्रमाची व्याप्ती –

अ.स्वयंअर्थसहायित व विना अनुदानित शाळा व तुकड्यांव्यतिरिक्त राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमांच्या इ. २ री ते ५ वी च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी लागू राहील. (इयत्ता ६ वी ते ८ वीच्या शिक्षकांना व विद्यार्थ्यांना ऐच्छिक स्वरुपात यात सहभागी होता येईल.)

अ.प्रथम भाषा व गणित विषय

## कृती कार्यक्रम कालावधी–

५ मार्च, २०२५ ते ३० जून, २०२५

## सुट्यांमधील सराव–

उपक्रमाच्या कालावधीत सुट्टीचा कालावधी आहे. यावेळी अध्ययनात मागे असणाऱ्या तसेच अपेक्षित अध्ययन क्षमता साध्य केलेल्या मुलांकरिता शिक्षकांनी आपल्या स्तरावरून विविध (ऑनलाईन / ऑफलाईन) मार्गांनी संपर्कात राहून अध्ययनाचे सातत्य राखले जाईल, चर्चा, मार्गदर्शन होईल असे नियोजन करावे, जेणेकरून अध्ययन केलेल्या बाबींचे विस्मरण होणार नाही.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे

# कृती कार्यक्रम अंमलबजावणीचे सूक्ष्म नियोजन-

1) शिक्षकांनी **अपेक्षित अध्ययन क्षमतांची स्तरनिहाय पडताळणी करावी, (अध्ययन क्षमता पडताळणी स्तराचा नमुना परिशिष्ट २ व ४ मध्ये नमूद आहे.) त्यानुसार अपेक्षित अध्ययन क्षमता प्राप्त नसलेल्या विद्यार्थ्यांना त्या क्षमता प्राप्त करण्यासाठी स्वत:चा विद्यार्थीनिहाय कृती कार्यक्रम आखावा.**

2) अपेक्षित अध्ययन क्षमता प्राप्त असलेल्या विद्यार्थ्यांचे वेळोवेळी स्वतंत्र गट करावे व त्यांचेसाठी नियमित अध्ययन कामकाज सुरु राहील अशी योजना करावी.

3) प्रत्येक गटाची गरज ओळखून साधन सामग्री पुरवावी. जसे- अध्ययन साधने, वाचन सामग्री, शब्द कार्ड, चित्रे, वस्तू इत्यादी. गटनिहाय अध्ययनाचे वेळापत्रक ठरवावे.

4) जसजसे विद्यार्थी या कृती कार्यक्रमासाठीच्या अपेक्षित अध्ययन क्षमता प्राप्त करतील तसा **प्रगती अहवाल "चावडी वाचन व गणन" कार्यक्रमात सादर करावा.**

5) दिनांक 30 जून, 2025 पर्यंत आपल्या इ. 2 री ते 5 वीच्या वर्गातील वर्गनिहाय किमान ७5 टक्के विद्यार्थी अपेक्षित सर्व अध्ययन क्षमता प्राप्त करतील याची खात्री प्रत्येक शिक्षकाने करावी.

6) **इयत्ता 2 री ते 5 वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना नियमितपणे शिकविणाऱ्या शिक्षकांची विशेष आदेशाने शिक्षकांच्या नावनिहाय प्रत्येक वर्गासाठी नेमणूक मुख्याध्यापकांनी तात्काळ करावी.**

# शिक्षकांनी आपल्या वर्गाचा अपेक्षित अध्ययनस्तर घोषित करणे –

१. विद्यार्थी व त्यांना अध्यापन करणारे शिक्षक यांची नोंदणी (Mapping) विद्या समिक्षा केंद्र (VSK) च्या माध्यमातून, वरील मुद्दा ६. (ऊ) च्या आदेशान्वये मुख्याध्यापकांद्वारे ऑनलाईन स्वरुपात करण्यात येईल.

२. दिनांक ०५/०३/२०२५ रोजीच्या पहिल्या अध्ययन क्षमता पडताळणीची नोंद ( विद्यार्थी निहाय व या कृती कार्यक्रमासाठी **अपेक्षित स्तरनिहाय अध्ययन क्षमता परिशिष्ट १, २, ३, ४ मध्ये नमूद केलेल्या स्वरुपात) शिक्षकांनी करून ठेवावी आणि नंतर विद्या समिक्षा केंद्र (VSK) च्या माध्यमातून देण्यात आलेल्या संकेतस्थळ / Bot वर नोंद करावी.** दि. ३० जून, २०२५ पर्यंत या कृती कार्यक्रमांतर्गत ज्या विद्यार्थ्यांचा अपेक्षित अंतिम अध्ययन स्तर प्राप्त झाला आहे त्यांची या विषयांची नोंद झाल्यावर आणखी काही नोंद करण्याची आवश्यकता नाही.

३. ज्या विद्यार्थ्यांचा अपेक्षित अंतिम अध्ययन स्तर प्राप्त झाला नाही त्या विद्यार्थ्यांच्या नोंदी पुढील तारखांना वरील संकेतस्थळ / Bot वर कराव्यात. **२० मार्च, ०५ एप्रिल, २० एप्रिल, ०५ मे, २० मे, १५ जून आणि ३० जून २०२५.**

**४. विद्या समिक्षा केंद्र (VSK) च्या माध्यमातून देण्यात आलेल्या संकेतस्थळ / Bot वर या कृती कार्यक्रमाचे उद्दिष्ट साध्य झाल्याचे घोषित करावे.**

५. मे महिन्यामध्ये सुट्ट्या मिळाव्यात यासाठी एप्रिल महिन्यामध्येच घाईत याविषयी घोषित करू नये किंवा **एकदा घोषित केल्यानंतर असे विद्यार्थी पुन्हा मागील टप्प्यावर येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.**

# अंतिम मूल्यांकन-

1. अपेक्षित अध्ययन स्तर प्राप्त म्हणून घोषित केलेल्या प्रत्येक वर्गाला **पर्यवेक्षकीय यंत्रणेमार्फत त्वरीत भेट देऊन विद्यार्थी, शिक्षक व शाळेचे कौतुक करण्यात यावे. भेटीचा अहवाल त्याच दिवशी पर्यवेक्षकीय यंत्रणेने विद्या समिक्षा केंद्र (VSK) च्या माध्यमातून** देण्यात आलेल्या संकेतस्थळ / Bot वर नोंदवावा. अशा सर्व भेटी दि.15 जूलै, 2025 अखेर पूर्ण करण्यात याव्यात.
2. **अनुपस्थित विद्यार्थ्यांचे दुसऱ्या दिवशी अथवा असे विद्यार्थी ज्या दिवशी शाळेत उपस्थित होतील त्या दिवशी** पर्यवेक्षकीय यंत्रणेमार्फत पुन्हा प्रत्यक्ष भेट देऊन कौतुक करण्यात यावे.
3. ज्या वर्गासाठी उपरोक्त प्रमाणे स्वयंघोषणा विद्या समिक्षा केंद्र (VSK) संकेतस्थळ / Bot वर संबंधित शिक्षकांनी केलेली नाही, त्या वर्गावर **या कृती कार्यक्रमाव्यतिरिक्त स्थानिक / राज्य पातळीवरील असा कोणताही इतर उपक्रम जो, या कृती कार्यक्रमाच्या अपेक्षित उद्दिष्टांच्या वरच्या स्तराचे लक्ष्य ठेवतो, राबविण्यात येऊ नये.**

# लोकसहभाग व सामाजिक अंकेक्षण (Social Audit)-

1. **दर 15 दिवसांनी गावपातळीवर "चावडी वाचन व गणन" कार्यक्रम राज्यस्तरावरून नेमून दिलेल्या तारखांना आयोजित करण्यात यावा.**

2. **दिनांक 01 मे, 2025 रोजीच्या ग्रामसभेमध्येही "चावडी वाचन व गणन" सादरीकरण आयोजित करावे**.

3. आवश्यकतेप्रमाणे खडू-फळ्याची उपलब्धता या कार्यक्रमाच्या ठिकाणी करावी. अशा विद्यार्थ्यांना एखादे छोटे बक्षीस देण्याचा प्रयत्नही करावा.

4. अपेक्षित अध्ययन क्षमता प्राप्त करु न शकलेल्या विद्यार्थ्यांना सर्वांसमोर वाचन अथवा गणन करण्यास सांगण्यात येऊ नये. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळेल अशीच व्यवस्था करावी. विद्यार्थी नाउमेद होणार नाहीत याची काळजी घ्यावी.

5. परिसरातील इच्छुक सुशिक्षित स्वयंसेवकांची मदत मिळविण्याचाही प्रयत्न करण्यात यावा.

# शिक्षक व शाळांना प्रशस्तीपत्रक–

१. विहित कालावधीत या कृती कार्यक्रमासाठी अपेक्षित अध्ययन स्तर गाठणाऱ्या **शाळा व शिक्षकांना प्रशस्तीपत्रक** देऊन सन्मानित करण्यात येईल. तसेच उत्कृष्ट कामकाज करणारे **क्षेत्रीय अधिकारी यांनाही प्रमाणपत्र** देण्यात येईल

२. ज्या शाळा, शिक्षक दिलेल्या कालावधीत अपेक्षित **उद्दिष्टे साध्य करणार नाहीत अशा शिक्षकांकडे विशेष प्रशासकीय व अध्ययनात्मक लक्ष देण्यात येईल.**

३. कृती कार्यक्रम कालावधीत एखादा विद्यार्थी नव्याने शाळेत दाखल झाला तरी तो/ ती या कृती कार्यक्रमाचा भाग समजण्यात यावा. **कोणत्याही परिस्थितीत शाळेत नवीन दाखल्यांना थांबविण्यात येऊ नये.**



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र.पुणे

## शिक्षण परिषद–

**माहे मार्च, एप्रिल, मे व जून च्या केंद्रस्तरीय शिक्षण परिषदांमध्ये** या कृती कार्यक्रमाच्या अनुषंगाने चर्चा करावी. जसे- अध्ययन स्तर, कृती कार्यक्रम कार्यपद्धती, उद्दिष्टे साध्य होण्यासाठी करावयाचे प्रयत्न, उद्दिष्टे साध्य केलेल्या शिक्षकांचे अनुभव कथन, नियोजनपूर्वक केलेले कामकाज, नाविन्यपूर्ण बाबी, साहित्याचा वापर, शिक्षकांना येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाय, इत्यादी.

## शाळा भेटी–

या कालावधीत शाळाभेटी करताना पर्यवेक्षकीय यंत्रणेने याच मुद्द्यांकडे प्रामुख्याने लक्ष केंद्रित करावे. सुरु असलेल्या कामाचा आढावा घ्यावा, **मार्गदर्शन व सहाय्य करावे.**

# जबाबदार घटक-

१. **विद्या समीक्षा केंद्र (VSK)-** वर्ग व त्यांना अध्यापन करणारे शिक्षक यांची नोंदणी (Mapping) मुद्दा क्र. ६. (ऊ) अंतर्गत आदेशान्वये करणे. वर्ग घोषित करण्याची विद्यार्थीनिहाय ऑनलाईन सुविधा पुरविणे. पडताळणीबाबत माहिती भरल्यानंतर त्याबाबत प्रगतीदर्शक व स्थितीदर्शक विविध अहवाल तयार करुन प्रसिद्ध करणे.

२. **शिक्षक-** अपेक्षित अध्ययन क्षमता अपेक्षित स्तरापर्यंत साध्य करतील.

३. **मुख्याध्यापक**मुख्याध्यापकांनी मुद्दा क्र. ६. (ऊ) अंतर्गत शिक्षकांचे आदेश दि.०६/०३/२०२५ पूर्वी निर्गमित करावेत.

४. **पर्यवेक्षण यंत्रणा-** प्रत्येक पर्यवेक्षकीय अधिकारी यांनी दर आठवड्यात विद्या समिक्षा केंद्र (VSK) वर या कृती कार्यक्रमासाठी अपेक्षित अध्ययन स्तर प्राप्त न झालेल्या किमान ५ शाळांना भेटी देऊन शिक्षकांना सहाय्य करावे व अडचणी समजून घेऊन मार्गदर्शन करावे.

५. **राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे, सर्व प्रादेशिक विद्या प्राधिकरणे, आणि सर्व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था** - आवश्यक सराव साहित्य, जादूई पिटारा, पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियान (FLN) इ. साहित्याचा वापर करण्याविषयी मार्गदर्शन करावे.

६. **आयुक्त (शिक्षण) व शिक्षण संचालक (प्राथमिक)-** सर्व अधिनस्त कार्यालये व अधिकारी यांचे प्रभावी संनियंत्रण करावे.